<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक ११०/२०१२ निशाणी ४६ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी निशाणी ४३ वरील आदेशाचे पुर्नविलोकन होवून निशाणी ४३ चा अर्ज मंजूर होणे विषयी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, दावा हा हक्कज्ञापनाचा असून त्यांनी निशाणी ४३ कडे अर्ज देवून मुद्दे सुचविले होते. तथापी तो अर्ज नामंजूर झाला आहे. त्यांचे म्हणणेनुसार त्याने सुचविलेले मुद्दे आवश्यक आहेत. सबब त्याने नि ४३ कडील आदेशाचे पुर्नविलोकन होवून मिळणे विषयी विनंती केली आहे.

३. वादी ने म्हणणे देवून अर्जास तिव्र विरोध केला आहे. त्यांचे म्हणणेनुसार पुर्नविलोकन करणेसाठी कोणतीही परिस्थीती निर्माण झालेली नाही. तसेच प्रस्तुत अर्ज मुदतीत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे निशाणी ४८ कडील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निशाणी ४३ कडे प्रतिवादींनी तीन जादा मुद्दे सुचवून ते काढणेसाठी अर्ज दिला होता. तो अर्ज दिनांक १९/०१/२०१७ रोजी गुणदोषावर निकाली काढणेत आला आहे.

६. प्रतिवादीने सुचविलेल्या मुददा क्रमांक १ बाबत वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यास कारण दावा दाखल करणेपूर्वी एक महीना अगोदर घडले आहे. याउलट कैफियतीचे अवलोकन कले असता प्रतिवादीने दावा मुदतीत नाही अशी मोघम हरकत

(evasive denial) घेतली आहे. दावा मुदतीत आहे किंवा नाही हे केवळ वादपत्रातील कथनावरुन ठरवता येते. मुदतीच्या कायदयाप्रमाणे दावा जर मुदतीत नसेल तर प्रतिवादीने त्याबाबत हरकत घेतली नाही तरी दावा चालविता येत नाही. परंतु प्रस्तुत दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता दावा मुदतीत असल्याचे दिसून येते. प्रतिवादीने त्यास मुदती बाबत हरकत घेणेची असलेस दि. प्र. संहिता क्रम ८ नियम ३ व ४ प्रमाणे प्रतिवादीने फक्त वादीचे कथन नाकारुन चालत नाहीत तर त्याबाबत त्यांनी प्रतिउत्तरही(answer to the point of substance) देणे आवश्यक आहे. तसे प्रतिउत्तर प्रतिवादीने दिलेले नसल्यामुळे मुदतीबाबत मुददा काढणेची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रतिवादीतर्फे करणेत आलेल्या, प्रतिवादींनी त्याचे कैफियतीमध्ये प्रतिउत्तर (answer to the point of substance) दिलेले आहे या युक्तीवादामध्ये तथ्य आढळत नाही.

७. प्रतिवादीतर्फे त्याने सुचविलेल्या मुददा क्रमांक २ व ३ बाबत असे सांगण्यात आले की, वादीने शासनाचे रस्त्याची जागा स्वतःची असले बाबत हक्कज्ञापन मागीतले असल्याने महाराष्ट्र शासन व ग्रामपंचायतीला ही पक्षकार करणे जरुरीचे आहे. तसे त्यांना पक्षकार केलेस या कोर्टास दावा चालविणेचा अधिकार राहत नाही. तसे त्यांने कैफियतीमध्ये कथन केले आहे. सदर हरकतीबाबत वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दावा मिळकत ही वादींची पूर्वापार खाजगी मालकी व वहीवाटीची आहे असे कथन केले आहे. प्रतिवादी म्हणतो तसे वादीने शासनाच्या रस्त्याची जागा स्वतःची असले बाबत वादपत्रात कोठेही कथन केलेले नाही. महाराष्ट्र शासन व ग्रामपचायतीला पक्षकार केले नसल्यामुळे दाव्यास non-joinder of necessary party ची बाधा येते किंवा काय याबाबत निशाणी ४० कडे अलाहिदा मुददा काढलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या अधिकारक्षेत्रा बाबतच्या हरकतीवरुन

त्याने सुचविलेले मुददा क्रमांक २ व ३ काढणेची आवश्यकता नाही. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार शासनाची जागा असल्याने महाराष्ट्र शासनाला पक्षकार केल्यास प्रस्तुत दावा या कोर्टास चालविण्याचा अधिकार नाही. परंतु, प्रस्तुत दाव्यास सदय स्थितीला महाराष्ट्र शासन पक्षकार नाहीत. त्यामुळे प्रतिवादी म्हणतात तसे प्रस्तुत दावा चालविण्याचा या कोर्टास अधिकार नसल्याचे त्यांचे म्हणणे न पटण्यासारखे आहे.

८. निशाणी ४३ कडील आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी प्रतिवादीं म्हणतात तसे कोणताही सकृतदर्शी दोष (error apparent on the face) किंवा दिवाणी प्रक्रीया संहीता कलम ११४ व क्रम ४७ प्रमाणे कोणतीही परिस्थीती दिसून येत नाही.

९. निशाणी ४३ कडील आदेश दिनांक १९/०१/२०१७ रोजी झालेला आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक १८/०४/२०१७ रोजी दिलेला आहे. मुदतीचा कायदा आर्टीकल १२४ प्रमाणे आदेश झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुर्नविलोकन अर्ज करणे आवश्यक आहे. प्रस्तुत केसमध्ये प्रतिवादींनी त्याप्रमाणे मुदत संपून किर्तेक दिवसानंतर अर्ज दिला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मुदतीत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे तो फेटाळणेस पात्र आहे.

१०. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे –

अर्ज नामंजूर करणेत येतो.

सही/–

दिनांकः ०६/०७/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड